महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या,पुणे

५,बी.जे.रोड,पुणे - ४११ ००१.

विविध पदांच्या सेवा-करार पध्दतीने घेण्याविषयी अटी व शर्ती

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या,पुणे या राज्यस्तरीय सहकारी शिक्षण-प्रशिक्षण देणा-या शिखर सहकारी संस्थेमध्ये मुख्य कार्यालय व त्यासोबतच्या संलग्न कार्यालयामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हयांमध्ये खालील नमुद पदांकरिता करार / तात्पुरत्या स्वरुपात मनुष्यबळाची आवश्यकता असून त्याकरिता करार पध्दतीने सेवा घेण्यासाठी पात्र व इच्छुक व्यक्तींकडून दिनांक १.१२.२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याकरिता आवश्यक तपशील व अटी/शर्ती खालीलप्रमाणे.

१.आवश्यक पदांचा / सेवांचा तपशील : १.सहकार प्रशिक्षण निदेशक - संख्या - ६४
२.संगणक टेक्निशियन - संख्या - ०१
३.कनिष्ठ लिपीक - संख्या - २७
४.शिपाई - संख्या - १८
५.स्वच्छक - संख्या ०१

एकूण : १११

अ. क्र	कार्यालयाचे नांव	पद				
		सहकार प्रशिक्षण निदेशक	संगणक टेक्निशियन	कनिष्ठ लिपीक	शिपाई	स्वच्छक
१ (१)	मुख्य कार्यालय,पुणे (प्रशा.आस्था.)	-	१	२	२	१
(२)	मुख्य कार्यालय ,पुणे (लेखा)	-	-	२	-	-
(३)	मुख्य कार्यालय,पुणे (शिक्षण-प्रशिक्षण)	-	-	२	१	-
(४)	मुख्य कार्यालय, पुणे(प्रसिध्दी)	-	-	१	१	-
२ (१)	पुणे बोर्ड	४	-	१	-	-
(२)	सोलापूर बोर्ड	३	-	१	-	-
(३)	कोल्हापूर बोर्ड	५	-	१	-	-
(४)	सातारा बोर्ड	४	-	१	-	-
(५)	सांगली बोर्ड	३	-	-	१	-
(६)	नाशिक बोर्ड	४	-	१	-	-
(७)	अहिल्यानगर बोर्ड	५	-	१	-	-
(८)	जळगांव बोर्ड	२	-	-	१	-
(९)	मुंबई बोर्ड	९	-	२	-	-
(१०)	ठाणे बोर्ड	८	-	१	१	-
(११)	रायगड बोर्ड	२	-	-	-	-
(१२)	रत्नागिरी बोर्ड	२	-	१	१	-
(१३)	सिंधुदुर्ग बोर्ड	१	-	१	-	-
(१४)	छत्रपती संभाजीनगर बोर्ड	३	-	१	१	-
(१५)	लातूर बोर्ड	१	-	-	-	-

(१६)	धाराशिव बोर्ड	-	-	१	-	-
(१७)	बीड बोर्ड	१	-	१	१	-
(१८)	अमरावती बोर्ड	१	-	१	-	-
(१९)	बुलढाणा बोर्ड	-	-	१	-	-
(२०)	नागपूर बोर्ड	२	-	-	-	-
(२१)	चंद्रपूर बोर्ड	२	-	-	-	-
(२२)	गडचिरोली बोर्ड	१	-	-	१	-
(२३)	वर्धा बोर्ड	१	-	-	-	-
३(१)	कोल्हापूर केंद्र	-	-	१	-	-
(२)	सांगली केंद्र	-	-	१	१	-
(३)	अहिल्यानगर केंद्र	-	-	१	१	-
(४)	मुंबई केंद्र	-	-	१	१	-
(५)	नाशिक केंद्र	-	-	-	१	-
(६)	लातूर केंद्र	-	-	१	-	-
(७)	जळगांव केंद्र	-	-	-	१	-
(८)	पुणे केंद्र	-	-	-	१	-
(९)	छ. संभाजीनगर	-	-	-	१	-
	एकुण	**६४**	**१**	**२७**	**१८**	**१**

२.कामाचे कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हयांमध्ये संबंधित पदाच्या अर्हतेनुसार कार्यक्षम व पात्र उमेदवार.

३.कामाचा कालावधी : ११ महिने

४.पदनिहाय शैक्षणिक अर्हता : १.सहकार प्रशिक्षण निदेशक -

१.मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला,वाणिज्य,विज्ञान या पैकी कोणत्याही एका शाखेची प्रथम/द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी आवश्यक.

२.मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड.परीक्षा उत्तीर्ण किंवा

३.सहकारातील एच.डी.सी.एम. ,डी.सी.बी.एम. ,जी.डी. सी.ॲन्ड ए.पैकी एक पदविका किंवा

४.शासनाने संगणकासाठी विहीत केलेली परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य

२. संगणक टेक्निशियन -

१. सदर पदासाठी मान्यताप्राप्त संस्थेचा डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग प्रथम श्रेणीतील पदवी / पदविका आवश्यक.

२.मराठी,हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक

३. कनिष्ठ लिपीक

१.मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला,वाणिज्य,विज्ञान या पैकी कोणत्याही एका शाखेची द्वितीय श्रेणीतील पदवी आवश्यक.

२.शासनाने संगणकासाठी विहीत केलेली परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

३.सहकारातील डी.सी.एम.,एच.डी.सी.एम.पैकी एक पदविका उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.

४.शिपाई

१.मान्यताप्राप्त संस्थेची १० वी परिक्षा उत्तीर्ण आवश्यक.

५.स्वच्छक

१.मान्यताप्राप्त संस्थेची ७ वी परिक्षा उत्तीर्ण आवश्यक.

५.इतर अटी :

१.जाहिरात रदद् करण्याचे अथवा संपूर्ण प्रक्रिया रदद् करण्याचे पूर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित,पुणे यांना राहील.

२.आवश्यकतेनुसार पदांची संख्या वाढविणे / कपात करण्याचा अधिकार संघाकडे राहील.

६.संपर्क तपशील :

१.पत्ता : महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या,पुणे
५,बी.जे.रोड,पुणे - ४११००१
२.दुरध्वनी : ०२० - २६१२२६४०
३.ई मेल : Sahasangh@yohoo.in
४.संकेतस्थळ : http://mrsspune.in

७.निवड प्रक्रीया :-संघास प्राप्त झालेल्या अर्जामधून पदनिहाय मुलाखत प्रक्रीया राबवून उमेदवारांची निवड करण्यात येईल.

८.वयो मर्यादा :- संघामध्ये नेमणुक करावयाच्या स्वच्छक, शिपाई,कनिष्ठ लिपीक,संगणक टेक्नीशियन, व सहकार प्रशिक्षण निदेशक यांचे वय कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

९. कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीने त्यांचे समकक्ष हुद्यावरील अधिका-यांना देण्यात आलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१०.कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्ती संघाच्या कामकाजात सतर्क राहतील.कार्यालयीन कामकाजामध्ये गैरव्यवहार / अनियमितता निदर्शनास आल्यास किंवा नेमून दिलेल्या कामामध्ये त्यांच्याकडून निष्काळजीपणा अथवा संघास कोणत्याही स्वरुपाची आर्थिक तोषिस लागल्यास त्याची भरपाई करण्याची सर्व जबाबदारी संबंधित सेवकाची राहील.तसेच त्यांचेविरुध्द रितसर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार संघाचा राहील.

११.कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तींने संघाचे दैनंदिन कामकाज करण्यास शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याबाबतचा जिल्हा वैद्यकीय चिकीत्सकाचा दाखला देणे आवश्यक राहील.

१२.करार पध्दतीने नेमणुक देण्यात येणा-या व्यक्तीस संघाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल.तसेच त्यांच्याकडे सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसाईक कामात ते गुंतणार नाहीत.

१३. कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीने संघाच्या कामकाजाची गोपनीयता ठेवणे आवश्यक आहे. तसेच संघाच्या हितास बाधा येणार नाही याची काळजी घेतली पाहीजे.

१४.कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीस संघास लागु असलेले पोटनियम तसेच तयार केलेले प्रचलित नियम व अटी बंधनकारक राहतील. त्यांना संघाने वेळावेळी देण्यात येणारे आदेश व शिस्तीचे पालन करावे लागेल.

१५.कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीस वर्षातून १२ दिवस नैमित्तीक रजा देण्यात येईल. त्यांना अर्जित किंवा वैद्यकीय रजेचा हक्क सांगता येणार नाही.

१६. कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीस रु.५००/- च्या बाँन्ड पेपवरवर रक्कम रु.२,००,०००/- सिक्युरीटी बाँड द्यावा लागेल.

१७. कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीस संघास विहीत नमुन्यात रु.५००/- स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

१८. कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीची नेमणुक ११ महिने मुदतीकरिता करण्यात येईल.त्यांचे कामकाज समाधानकारक असल्यास त्यानंतर त्यांना पुनश्चः मुदतवाढ देण्याचा अथवा मुदतवाढ नाकारण्याचा अधिकार संघास राहील.

१९.कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीने त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.त्यांच्या कामकाजाबाबत नेमणुकीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी त्यांच्या कामकाजाचा वेळावेळी आढावा घेऊन त्यांच्या कामकाजाचे मुल्यमापन करतील. त्यांचे कामकाज असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास अथवा नेमुणकीची संघास आवश्यकता नसल्यास त्यांना पूर्वसुचना अगर कोणतेही कारण न देता संघाचे नेमणुकीतून मुक्त करण्यात येईल.

२०.करार सुरु झाल्याच्या तारखेपासून ११ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर हा करार आपोआप संपुष्टात येईल.

२१.कराराचा कालावधी संपण्यापूर्वी सेवकाचे कामकाज असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास करारातून मुक्त करण्याचा अधिकार संघास राहील.

२२. उपरोक्त बाबींना बाधा न आणता सेवकाने कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास किंवा संघाच्या विरोधात काम केल्यास,संघाच्या कामाशी गैरवर्तन केल्यास संघ कोणतीही आगावू सुचना न देता हा करार संपुष्टात आणण्यास पात्र असेल.संघाच्या हिताच्या विरोधात काय आहे आणि गैरवर्तन कशाला म्हणतात याचा निर्णय घेण्याचा अधिकार केवळ संघालाच असेल.

२३.सहकार प्रशिक्षण निदेशक या पदासाठी संघाने दरमहा दिलेले किमान सहकारी शैक्षणिक कार्यक्रमाचे उद्दिष्ट तसेच सदर कार्यक्रमामध्ये खर्च वजा जाता दरमहा निव्वळ शिल्लक उत्पन्न रक्कम रु.४०,०००/- मासिक उद्दिष्ट पूर्ण करावे लागेल. त्यांना खर्च वजा जाता एकत्रित शुल्क उत्पन्नाचे वार्षिक उद्दिष्ट रक्कम रु.४,८०,०००/- इतके असेल.

२४.ज्या सेवकाच्या निष्काळजीपणामुळे,हलगर्जीपणामुळे किंवा कर्तव्यात कसूर केल्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे होणारे कोणतेही नुकसान / हानी सदर सेवकाकडून वसूल केली जाईल.कोणतीही तक्रार आल्यास संघाकडून चौकशी केली जाईल आणि पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अहवाल सादर केला जाईल.

२५.कराराने नेमणुक केलेले सेवक कोणत्याही गुन्हेगारी कार्यात,गैरप्रकारामध्ये किंवा अवांछित कृत्यामध्ये सामील होणार नाहीत.अशा परिस्थितीत त्यांच्यावर कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई केली जाईल.

२६.कराराद्वारे नेमणुक केलेले सेवकाला संघाच्या सेवेत नियमित करण्यासाठी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करण्याचा अधिकार राहणार नाही.

२७.कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीस संघामार्फत सोपविलेल्या जबाबदारीच्या कामासाठी खालीलप्रमाणे एकवट मासिक सेवा शुल्क अदा करण्यात येईल.

अ.क्र.	पदाचे नांव	११महिन्याच्या कालावधीमध्ये देण्यात येणारे उत्पन्नाचे उदिदष्ट् रु.	दरमहा सेवा शुल्क रक्कम रु.
१	स्वच्छक	-	१२,०००/-
२	शिपाई	-	१२,०००/-
३	कनिष्ठ लिपीक	-	१५,०००/-
४	संगणक टेक्नीशियन	-	२०,०००/-
५	सहकार प्रशिक्षण निदेशक	४,८०,०००/-	रुपये २०,०००/- + रु.३,६००/- फिरती भत्ता प्रति महिना

२८. कराराने नेमणुक करावयाच्या व्यक्तीने दिलेले उद्दिष्ट पूर्ण केल्यानंतर त्यापुढील उत्पन्नावर त्यांना पुढील प्रमाणे प्रोत्साहन भत्ता कराराची मुदत संपल्यानंतर अदा करण्यात येईल.

अ. क्र.	पदाचे नांव	उद्दिष्ट रक्कम रुपये	प्रोत्साहन भत्ता
१	सहकार प्रशिक्षण निदेशक	४ लाख ८० हजार वरील ते ६ लाखा पर्यंत	१० टक्के
		६ लाखावरील ते ८.५० लाखापर्यंत	१२ टक्के
		८.५० लाखावरील ते ११ लाखा पर्यंत	१५ टक्के
		११ लाखाच्या वरील	२० टक्के

२९.अपवादात्मक परिस्थितीमध्ये वरील पैकी एक किंवा अधिक अटी व शर्ती शिथील करण्याचा अथवा यापेक्षा जादा अटी व शर्ती लागु करण्याचा अधिकार संघाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

अपर निबंधक सहकारी संस्था तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी